“मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास” (दक्ष) प्रकल्प राबविण्यास मान्यता देणेबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: जाबँप्र-२०२३/प्र.क्र.०६/ व्यशि-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८ डिसेंबर, २०२३.

**वाचा**:-१) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालील दि. ०३ डिसेंबर २०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
२) DEA च्या छाननी समितीचे बैठकीचे इतिवृत्त, दिनांक २७ फेब्रुवारी २०२३.
३) केंद्रीय वित्त विभागाचा आर्थिक कार्य विभाग (DEA), पत्र, दिनांक ९ मार्च २०२३.
४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचा शा. नि. दिनांक ०८ जून २०२३.
५) दिनांक ०६ डिसेंबर २०२३रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णय.

**प्रस्तावना**:-

केंद्रशासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता संदर्भातील राष्ट्रीय कौशल्यविषयक धोरणानुसार रोजगाराची संधी व पुरवठा यामध्ये सुसंगती साधण्याच्या हेतूने कौशल्य प्रशिक्षण व त्यानुषंगाने रोजगार व उद्योजकाच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत रोजगारक्षम वयोगटातील युवा वर्गास आवश्यक कौशल्यांनी प्रशिक्षित करुन त्यांना रोजगारक्षम व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून उद्योजक बनविण्यासाठी विविध योजना व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. सदर योजना व कार्यक्रमांच्या यशस्वी व प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागाच्या अधिनस्त व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय कार्यरत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्योग केंद्रित कालसुसंगत कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यात आलेली आहे.

राज्यातील व्यावसायिक शिक्षण, नाविन्यता व कौशल्य वृद्धी विषयक योजनांची अंमलबजावणी आणि त्यासाठीच्या आवश्यक गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधा व कार्यप्रणालींचा विकास आणि त्यांच्या बळकटीकरणाकरिता जागतिक बँक सहाय्यित " मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास" (दक्ष) प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले.

सदर प्रकल्पाचा प्राथमिक प्रकल्प अहवाल (Preliminary Project Report) वित्त विभागामार्फत आर्थिक कार्य विभाग (DEA), भारत शासन यांना दि. १० जानेवारी, २०२३ रोजी मान्यतेसाठी सादर केलेला होता. यास अनुसरुन केंद्र शासनाच्या आर्थिक कार्य विभागाच्या (DEA) छाननी समितीने दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने, Development of Applied Knowledge and

Skill for Human Development (DAKSH) प्रकल्पास दिनांक ०८ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वतः मान्यता देण्यात आलेली आहे.

जागतिक बँक सहाय्यित" मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास" - (दक्ष) प्रकल्प राबविण्यास DAKSH प्रकल्पाची आखणी व अंमलबजावणी, प्रशासकीय व वित्तीय रचनेस मान्यता देऊन प्रकल्प संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यासाठी दिनांक ०६ डिसेंबर, २०२३ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर प्रकल्प राबविण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

जागतिक बँक सहाय्यित" मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास" - (दक्ष) प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. "दक्ष प्रकल्प" अंदाजित रुपये २३०७ कोटी (USD २१४.२२६ Million) रक्कमेचा असून सदर प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक असलेल्या एकूण निधीपैकी ७०% (अंदाजित रु.१६१५ कोटी) निधी जागतिक बँकेच्या कर्जाद्वारे व उर्वरित ३०% (अंदाजित रु.६९२ कोटी) निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

२. दक्ष प्रकल्पातील प्रमुख घटकांना खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहेत:-

| अ.क्र. | नाव | रूपये |
|---|---|---|
| १. | मॉडेल आय.टी.आय. स्थापन करणे | १३२५ कोटी |
| २. | वर्ल्ड स्किल सेंटर जागतिक कौशल्य केंद्र | ३०० कोटी |
| ३. | महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ | २५० कोटी |
| ४. | डाटा सेंटर | १०० कोटी |
| ५. | विविध संस्थांचे बळकटीकरण | १७८ कोटी |
| ६. | उद्योजकता विकास कार्यक्रम :- | |
| | अ) सिडबीव्दारे Fund of Fund (निधीचा निधी) | १०० कोटी |
| | ब) इतर माध्यमांच्या सहाय्याने उद्योजकता विकास कार्यक्रम | ५४ कोटी |
| **एकूण** | | २३०७ कोटी (USD २१४.२२६ Million) |

३. जागतिक बँक सहाय्यित मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (Development of Applied Knowledge and Skills for Human Development (DAKSH) प्रकल्पाकरीता खालीलप्रमाणे प्रशासकीय व वित्तीय रचना करण्यात येत आहे.

**अ. प्रकल्प अंमलबजावणी संस्था** (Project Implementation Agency):- कौ. रो. उ. व ना. विभाग हा सदर प्रकल्पासाठीची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून कार्य करेल. या प्रकल्पाकरीता वित्त विभागाच्या मान्यतेने स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्यात येतील. या लेखाशिर्षांतर्गत प्रकल्पाकरीता आवश्यक निधी अर्थसंकल्पीत करून अंमलबजावणी करीता संबंधीत "प्रकल्प अंमलबजावणी कक्ष" यास वितरीत केला जाईल. प्रत्येक प्रकल्प अंमलबजावणी कक्ष निधीच्या खर्चाचे अभिलेख स्वतंत्रपणे ठेवतील.

**ब. प्रकल्प अंमलबजावणी कक्ष** (Project Implementation Unit):- कौ.रो.उ.व ना. विभागाच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ हे "प्रकल्प अंमलबजावणी कक्ष" म्हणून कार्य करतील आणि "दक्ष" प्रकल्पातील त्यांच्या विषयाशी संबंधीत प्रत्यक्ष कामकाजाची अंमलबजावणी करतील.

**क. प्रकल्प व्यवस्थापन कक्ष** (Project Management Unit):- आयुक्त तथा पदसिद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी हे प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे पदसिद्ध "प्रकल्प व्यवस्थापक" म्हणून कामकाज पाहतील.

<u>प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची कार्ये खालील प्रमाणे राहतील:-</u>

i. जागतिक बँकेच्या सहाय्याने "विस्तृत प्रकल्प आराखडा तयार करून प्रकल्प समन्वय समितीस मान्यतेसाठी सादर करणे.

ii. दरवर्षी वार्षिक कृती आराखडा (वित्तीय भारासह) तयार करुन त्यास प्रकल्प समन्वय समितीस मान्यतेसाठी सादर करणे.

iii. प्रकल्प समन्वय समितीच्या निर्देशानुसार प्रकल्पाचे व्यवस्थापन व दैनंदिन कामकाज पाहणे. प्रकल्प अंमलबजावणी कक्षांच्या माध्यमातून प्रकल्प अंमलबजावणी करणे व त्याचा अहवाल वेळोवेळी प्रकल्प समन्वय समितीसमोर सादर करणे.

iv. प्रकल्पांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पातील घटक व उपघटक निहाय बाबींप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी कक्षांकडून (PIUs) कडून सादर होणाऱ्या प्रस्तावांची उदा. साहित्य खरेदी / बांधकामे/ मनुष्यबळ संबंधातील कामे (निविदेसह) च्या प्रस्तावांची तपासणी करेल आणि अंमलबजावणीकरीता मान्यता देईल. प्रकल्प अंमलबजावणी कक्षांमार्फत यासंदर्भात होणाऱ्या कार्यवाही / अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेईल.

**ड. प्रकल्प समन्वय समिती** (Project Coordination Committee):-

प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या कामकाज व्यवस्थापनासाठी, विभागाचे अ.मु.स. / प्र.स/ सचिव यांचे अध्यक्षतेखाली प्रकल्प समन्वय समिती स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समितीचे सदस्याचे नाव | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | अ.मु.स. / प्रधान सचिव / सचिव, कौ.रो.उ. व ना. विभाग | अध्यक्ष |
| २. | कुलगुरु, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई. | सदस्य |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, म.रा. कौ. वि. सोसायटी, मुंबई. | सदस्य |
| ४. | मुख्य कार्यकारी अधिकारी, म.रा. ना. सोसायटी, मुंबई. | सदस्य |
| ५. | संचालक, व्य.शि.व प्र. संचालनालय, मुंबई. | सदस्य |
| ६. | संचालक, म.रा.कौ.व्य. शि.व प्र. मंडळ, मुंबई | सदस्य |
| ७. | सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प), कौ.रो.उ.व ना. विभाग, मुंबई. | सदस्य |
| ८. | सह सचिव / उप सचिव (व्यशि ४), कौ.रो.उ.व ना. विभाग, मुंबई. | सदस्य |
| ९. | तज्ञ सल्लागार (निमंत्रित) | २ सदस्य |
| १०. | आयुक्त, तथा पदसिद्ध मु.का.अ., म.रा. कौ. वि. सोसायटी, मुंबई. | सदस्य सचिव |

समितीचे अध्यक्ष आवश्यकतेप्रमाणे दक्ष प्रकल्पासंबंधातील विषयांबाबत संबंधित तज्ञ सल्लागारांस (कमाल २ सदस्य) संबंधित बैठकांकरीता निमंत्रित करतील.

प्रकल्प समन्वय समितीची कार्ये खालील प्रमाणे राहतील:-

i. विस्तृत प्रकल्प आराखडा (वित्तीय भारासह) मान्यतेसाठी राज्य सुकाणू समितीस सादर करणे.

ii. प्रकल्प अंमलबजावणीचा अहवाल वेळोवेळी राज्य सुकाणू समितीस सदर करणे.

iii. दरवर्षी प्रकल्पाचा वार्षिक कृती आराखडा (वित्तीय भारासह) मान्यतेसाठी राज्य सुकाणू समितीससादर करणे.

iv. प्रकल्पासंबंधीच्या आवश्यक त्या वस्तू व सेवांच्या खरेदीचे प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य सुकाणू समितीस सादर करणे.

इ. **राज्य सुकाणू समिती** (State Steering Committee):- प्रकल्पासंबंधी उच्चाधिकार असलेली मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे राज्य सुकाणू समिती स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समितीचे सदस्याचे नाव | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ३. | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ४. | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, कौ.रो.उ. व ना. विभाग | सदस्य |
| ५. | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सदस्य |
| ६. | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | सदस्य |
| ७. | अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग | सदस्य |
| ८. | सह सचिव / उप सचिव (व्यशि ४), कौ.रो.उ.व ना. विभाग, मुंबई. | सदस्य सचिव |

राज्य सुकाणू समितीची कार्ये खालील प्रमाणे राहतील:-

i. प्रकल्पाचे संनियंत्रण करणे.

ii. विस्तृत प्रकल्प आराखड्यास छाननीअंती (वित्तीय भारासह) मान्यता देणे.

iii. प्रकल्पाच्या वार्षिक कृती आराखडयास (वित्तीय भारासह) मान्यता देणे.

iv. प्रकल्पांतर्गत प्रकल्प किंमतीच्या मर्यादेत बदल करणे, प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेऊन राज्य स्तरावरुन संनियंत्रण करणे.

v. प्रकल्पाकरीता घटक निहाय निधी मंजूर करणे, प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या मर्यादेत आवश्यक त्याप्रमाणे उद्दिष्ट घटकांमध्ये सुधारणा करणे, बदल करणे.

vi. प्रकल्पासंबंधीच्या आवश्यक त्या वस्तू व सेवांच्या खरेदी प्रस्तावांस मान्यता देणे.

४. उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने Project Management Unit मध्ये सदर प्रकल्प कालावधीकरिता अस्थायी पदे निर्माण करण्यास तसेच आवश्यक कालावधीसाठी बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पद्धतीने आवश्यक ती पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. प्रकल्पाकरिता मंजूर केलेल्या पदांवर नियुक्ती / प्रतिनियुक्तीने नेमण्यात येणाऱ्या शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर विशेष प्रकल्प भत्ता देण्याबाबतचा निर्णय वित्त विभाग व राज्य सुकाणू समितीच्या मान्यतेने स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

६. प्रकल्प समन्वय समितीला दक्ष प्रकल्पामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यास तसेच प्रत्येक आर्थिक वर्षात दक्ष प्रकल्पाचा जागतिक बँकेमार्फत वेळोवेळी आढावा घेतल्यानंतर जागतिक बँकेच्या सहमतीने प्रकल्पासाठी आवश्यक नियतव्यय उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. जागतिक बँकेसोबत दक्ष प्रकल्पासंबंधी करार करताना वित्त विभागाच्या सहाय्याने आवश्यक असणाऱ्या कामकाज / अटींची पूर्तता करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

८. या प्रकल्पाकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१२१८१४५०२९८६०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANJUSHA AMIT KARANDE

Digitally signed by MANJUSHA AMIT KARANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=4b1c1c68b2fb7d60932c7a539658f299af288eb5fbe81ceb2178b5deea6f7a28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6BC8432DE7E7323854E5E7499C63951988287A093EF9B088F4B029753EA90109, cn=MANJUSHA AMIT KARANDE
Date: 2023.12.21 15:23:07 +05'30'

**( मंजुषा कारंडे )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) / मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव, मुंबई.
४. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई,
७. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
८. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल, लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
११. महालेखापाल, लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
१२. सहसंचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१४. निवासी लेखापरिक्षण अधिकारी, मुंबई.
१५. प्रकल्प व्यवस्थापक तथा आयुक्त, कौ. वि.रो. व उ. संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई.
१८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१९. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई.

२०. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद/ अमरावती /नागपूर,

२१. उपआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय मुख्यालय मुंबई / पुणे/ नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२२. सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.

२३. निवडनस्ती (व्यशि-४).